# न्यायनिवाडा

(दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी घोषीत)

प्रस्तुत प्रकरणी आरोपी हे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा, १८८७ च्या कलम १२(अ) अन्वये दोषपात्र गुन्हयाच्या संपरीक्षेस सामोरे जात आहेत.

२. अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील तसेच आरोपीतर्फे श्री एस.सी. बोरेले यांचा युक्तीवाद ऐकला.

३. आरोपीं विरुध्द नि.क्र.१२ वर गुन्हयाचा तपशिल नोंदविला व आरोपींना मराठी भाषेमध्ये वाचुन दाखविला. आरोपींने सदर आरोप नाकबुल असल्याचे कथन करुन गुन्हयाची संपरीक्षा करण्यात यावी अशी विनंती केली. आरोपींचा फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले नाही.

४. खटल्यातील अभिलेखावरील दस्त इत्यादीचे अवलोकन केल्यानंतर माझ्या समक्ष निर्णयाकरीता खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व समर्थनार्थ कारणे मी खालील प्रमाणे नमुद केलेले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, आरोपीं हे दिनांक २६/०८/२०२२ रोजी २२.१५ ते २३.२५ वाजताच्या दरम्यान मौजा पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ, येथील आखाडा वॉर्ड ५२ गंजीपत्यावर एक्का बादशाहा नावाचा हारजितचा जुगाराचा खेळ खेळतांना मिळुन आले ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता**

५. अभियोगपक्षा तर्फे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एक पंच

साक्षीदार तपासण्यात आला. मनोहर रतन सिडाम (साक्षीदार क्र.१), याची साक्ष नि.क्र. १२ वर नोंदविण्यात आली. नि.क्र.१ वरिल आदेशा नुसार अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. मनोहर रतन सिडाम(साक्षीदार क्र.१) हा जप्तीपंचनामावरील साक्षीदार आहे. मनोहर रतन सिडाम (साक्षीदार क्र.१) याच्या पुराव्यात असे आले आहे की, तो आरोपींना ओळखत नाही. त्याला पोलीसांनी पंच म्हणुन बोलावीले नाही. त्याच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. त्याने जप्ती पंचनाम्यावरील त्याची सही ओळखली, परंतु त्यातील मजकुर माहित नाही असे सांगीतले. या साक्षीदाराकडुन जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही.

७. अभियोगपक्ष इतर साक्षीदारांना साक्ष समंस काढून सुध्दा त्यांची उपस्थीती संपादीत करु शकले नाही. अभियोग पक्षाचे विवेचना नुसार पंचासमक्ष मुद्देमालाची जप्ती केली आहे. जप्त मुद्देमाल न्यायालयासमक्ष हजर केला नाही. जप्तीपंचनामा स्वतंत्र साक्षीदाराव्दारे सिध्द केला नाही. अभियोगपक्ष पुरेशी संधी देवून सुध्दा इतर साक्षीदाराची उपस्थिती संपादीत करु शकले नाही. साक्षीदार क्र.१ याच्या पुराव्याचे आधारे आरोपींने ५२ गंजीपत्यावर एक्का बादशाहा नावाचा हारजितचा जुगाराचा खेळ खेळण्याचे कृत्य केले हे निर्वीवाद सिध्द होत नाही.

८. अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर सदरचा गुन्हा सिध्द करण्याकरीता कोणत्याही स्वरुपाचा ठोस पुरावा आलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीं विरुध्द गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरले. अभियोगपक्षा तर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आले नाही. तसेच अभियोगपक्षा तर्फे तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदार याच्या मार्फत जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. जप्त मुददेमाल न्यायालया समक्ष हजर केला नाही. वरील सर्व कारणास्तव मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

९. प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेली नगदी रक्कम रु.६१०/– ही आरोपींने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने न्यायालयामध्ये अर्ज करुन सुप्रतनाम्यावर परत मागितले नाही. वरिल सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र. २ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र. १ निखील राजेश्वर परसूया, आरोपी क्र. २, **रोहीत रतनलालजी परसूया** व आरोपी क्र. ३ कैलास अशोक जयस्वाल यांची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) नुसार शिक्षा पात्र असलेल्या गुन्हयाच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात आली.

२. आरोपींचे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता च्या कलम ४३७(अ)च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपींने प्रत्येकी रु.५,०००/– वैयक्तीक जामीनबंधपत्र आणि तेवढयाच रकमेचा जामीन ऐपतदार दाखला दयावा.

४. प्रस्तुत खटल्यातील मुद्देमाल नगदी रक्कम रु. ६१०/– ही रक्कम याचिका कालावधी संपल्यानंतर मूळ मालकास ओळख पटवुन नियमानुसार परत करण्यात यावी व ५२ गंजीपत्ता साहित्य मुल्यहिन असल्यामुळे याचिका कालावधी नंतर नष्ट करण्यात यावे.

न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

दिनांक ०४/०१/२०२३

(**कु.स्नेहा एस. कुळकर्णी**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कोर्ट २, केळापूर.